# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## परिपत्रक

भारताच्या प्रजासत्ताक दिनानिमित्त सोमवार दिनांक २६ जानेवारी, २०२६ रोजी सकाळी ८.०० वाजता विद्यापीठाच्या आवारात मुख्य कार्यालयासमोर मा. प्रभारी कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण समारंभ संपन्न होणार आहे. तरी विद्यापीठातील सर्व प्रशासकीय अधिकारी, सर्व अधिविभागप्रमुख, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व सर्व अधिविभागातील विद्यार्थी/विद्यार्थीनी यांनी या समारंभास उपस्थित रहावे ही विनंती.

संदर्भ क्रं. शिवाजी वि/विद्यार्थी विकास/३५८
दिनांक : २१/०१/२०२५

प्र.संचालक
विद्यार्थी विकास

प्रति,

१. सर्व पदव्युत्तर विभाग प्रमुखांनी आपल्या विभागातील सर्व शिक्षक, विद्यार्थी–विद्यार्थीनी व प्रशासकीय सेवक यांना वरील समारंभास उपस्थित राहण्याबद्दल सुचना द्यावी.
२. सर्व उपकुलसचिव, कायदा अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, सहा. कुलसचिव व समकक्ष अधिकारी
३. सर्व प्रशासकीय विभाग प्रमुखांनी आपल्या विभागातील सर्व सेवकांना समारंभास उपस्थित राहण्याबद्दल सुचना द्यावी.
४. मा. कुलगुरु, मा. प्र–कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. वित्त व लेखा अधिकारी, मा. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ यांच्या कार्यालयास माहितीसाठी
५. अधिविभागप्रमुख, संगीत व नाटयशास्त्र अधिविभाग यांनी विद्यार्थी विकास विभागाशी संपर्क साधावा व सदरच्या कार्यक्रमाच्या वेळी राष्ट्रगीत, महाराष्ट्रगीत व विद्यापीठ गीत म्हणण्याची व्यवस्था करावी.
६. वाहन विभाग प्रमुख यांनी अधिविभागप्रमुख, संगीत व नाटयशास्त्र अधिविभाग यांच्या सूचनेप्रमाणे गायक कलाकार यांना वाद्ये आणणेसाठी वाहन उपलब्ध करून दयावे.
५. श्री. डी आर चौगुले व श्री. पाथरवट, जमादार यांनी दोन शिपाई या विभागाच्या शिपायाच्या मदतीस दयावेत. त्याचप्रमाणे त्यांनी स्वतः उपस्थित रहावे तसे आदेश आस्थापना विभागाने त्यांना द्यावेत.
६. विद्युत अभियंता यांनी वरील दिवशी ध्वजवंदन कार्यक्रमाच्यासाठी ध्वनिक्षेपकाची व्यवस्था करावी व रांगोळीसाठी आदल्या दिवशी लाईटची व्यवस्था करावी.
७. अभियांत्रिकी विभागाने वरील दिवशी कार्यक्रमाच्या ठिकाणी स्वच्छता ठेवण्यासाठी संबंधीत कर्मचारी यांना सूचना द्यावी. तसेच ध्वजस्तंभाची स्वच्छता व वरील कप्पीची ठाकठिकता पहावी. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळयाची देखभाल पहावी.
८. उद्यान विभाग यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मोठया पुतळयास अर्पण करणेसाठीचा पुष्पहार आणावा व तो अभियांत्रिकी विभागाच्या मदतीने अर्पण करण्याची व्यवस्था करावी.
९. नोटीस बोर्डवर लावणेसाठी –

| | |
|---|---|
| १) मुलींचे वसतिगृह क्र. १, २ व ३ | २) मुलांचे वसतिगृह क्र. १, २ व ३ |
| ३) डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन | ४) बॅरीस्टर बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय. |
| ५) डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थीनी भवन | ६) तंत्रज्ञान विद्यार्थी व विद्यार्थीनी वसतिगृह |

१०. सुरक्षा अधिकारी यांनी परेडसाठी स्कॉड तयार करावे व ध्वजारोहण प्रसंगी ध्वज हाताळण्यासाठी सुरक्षा रक्षकाची नियुक्ती करावी.

**टिप : सदरचे परिपत्रक आपल्या विभागातील सर्व अधिकारी व प्रशासकीय सेवक यांच्या निदर्शनास आणावे.**

––०००––